# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक ०४.०६.२०२६ गुरूवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक ०३.०६.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०५ ईसमांवर कारवाई करून ७६,६९५/–रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०१ केसेसमध्ये ०७ ईसमांवर कारवाई करून ३,२४०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,६९५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,१८,१००/–रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे बजाजनगर :– हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०४.०६.२०२६ चे ००.०५ वा. चे सुमारास, बजाजनगर पोलीसांचे पथकास खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे हद्दीत, चामडीया वस्ती, मुंडले कॉलेज मागे, काचीपुरा, नागपुर येथे राहणारा हद्दपार ईसम नामे करण प्रशांत शेंडे, वय ३२ वर्षे हा वस्तीत फिरत आहे. अशा प्राप्त माहीतीवरून, त्याचे राहते घरी चेक करण्यास गेले असता, तो पोलीसांना पाहुन पळु लागल्याने त्यास पोलीसांनी पाठलाग करून ताब्यात घेतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७३५/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोअं. योगेश्वर गायकवाड यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बजाजनगर येथे पोउपनि. अतुल आडे यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे तहसिल :– जबरी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ३१.०५.२०२६ चे २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादी सोहेब अख्तर अन्सारी, वय २० वर्षे, रा. कसाबपुरा ग्राऊंड जवळील मस्जीद जवळ, मोमीनपुरा, नागपुर हा जेवण झाल्यावर त्याचे राहते घराजवळ पायदळ फिरत असता, आरोपी १) मोहम्मद सबील अन्सारी, वय २५ वर्षे, रा. मस्जीद बकार कसाब जवळ, मोमीनपुरा, नागपुर २) मोहम्मद आतीक, वय २४ वर्षे, रा. कमालबाबा दर्गाह जवळ, मोमीनपुरा, नागपुर यांनी

संगणमत करून, फिर्यादीस बोलावुन दारू पिण्याकरीता पैसे मागीतले. फिर्यादी यांनी मनाई केली असता, आरोपींनी बाचाबाची व शिवीगाळ करून, फिर्यादीस हाथबुक्कीने मारहान केली व चाकुने मारण्याची धमकी देवुन, फिर्यादीचे खिश्यातील २,०००/—रू. जबरीने हिसकावून घेवुन पळुन गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसिल येथे आरोपीविरूध्द कलम ३०९(४), ३५१(३), ११५(२), ३(५) भा.न्या.सं., सहकलम ४, २५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. तहसिल पोलीसांनी आरोपी क्र. २ याचा शोध घेवून त्यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा आरोपी क्र. १ सोबत मिळुन संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपी क्र. २ यास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०२.०६.२०२६ चे १०.३० वा. ते दिनांक ०३.०६.२०२६ चे १०.२५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट नं. १५, मारोती नगर, ओम कॉलोनी, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. मिना रवि धांडे, वय ४२ वर्षे यांचे पतीचे एव्हर शाईन हॉस्पीटल, गणेशपेठ येथे ऑपरेशन असल्याने, त्या आपले राहते घराला कुलुप लावुन, दवाखान्यात गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लाकडी आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व ०१ डेल कंपनीचा लॅपटॉप असा एकुण किंमती १,६९,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. अहमदशहा शेख ९९९१९९५१९१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे जरीपटका</u> :—** करण कडुलाल श्रीवास, वय ३३ वर्षे, रा. गोपी किराणा स्टोअर्स जवळ, शनी मंदीर समोर, कळमना, नागपुर हे दिनांक १९.०५.२०२६ चे १९.०० वा. पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील स्नेहदिप कॉलोनी, प्लॉट नं. २५५, नारा रोड, जरीपटका, नागपूर येथील फिर्यादीचे राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मजबुत, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— निळ्या रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— मानेवर डाव्या बाजुला टॅटु व कानात पिवळ्या धातुची बाळी घातलेली आहे.



करण

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**